www.msdhulap.com

**अपात्र शिधापत्रिका मोहिम राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र: शिवाप-२०२१/ प्र.क्र. ०४/ नापू-२८**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा चौक, मंत्रालय मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: २८ जानेवारी, २०२१**

केंद्र शासनाकडून यापूर्वी प्राप्त झालेल्या निर्देशानुसार अपात्र शिधापत्रिकांचा शोध घेऊन अशा शिधापत्रिका रद्द करण्याच्या सूचना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्था ( नियंत्रण) आदेश, २०१५ मधील तरतुदीनुसार शिधापत्रिका तपासणी ही निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे अपात्र शिधापत्रिका शोधून रद्द करण्याकरिता खास शोध मोहिम राबविणे आवश्यक आहे. राज्यातील कार्यरत बी.पी.एल. अंत्योदय, अन्नपूर्णा, केशरी, शुभ्र व आस्थापना कार्ड या सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांची तपासणी करणेसाठी शोध मोहिम दि.०१.०२.२०२१ ते ३०.०४.२०२१ या कालावधीमध्ये राबविण्यात यावी. सदर शोध मोहिमेत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(अ) **सध्याच्या शिधापत्रिकाधारकांकडून माहिती घेणे-:**

(१) शहरातील प्रत्येक शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिकांची तपासणी करावी.

(२) वरीलप्रमाणे तपासणी करण्यासाठी त्या त्या विभागातील / कार्यालयातील रास्तभाव / अधिकृत शिधावाटप दुकानातून शासकीय कर्मचारी / तलाठी यांचेमार्फत ठरवून दिलेल्या वेळेत नमुना फॉर्म वाटप करण्यात येतील

(३) शासकीय कर्मचारी / तलाठी यांनी संबंधीत रास्तभाव दुकानास जोडलेल्या शिधापत्रिकाधारकांकडून माहिती भरून दिलेले फॉर्म स्विकृत करून अर्जदारास स्वाक्षरी व दिनांकासह पोच देण्यात यावी.

(४) फॉर्म भरून देताना फॉर्म सोबत शिधापत्रिकाधारकांनी ते त्या भागात राहात असल्याचा पुरावा द्यावा. पुरावा म्हणून उदा. भाडेपावती, निवासस्थानाच्या मालकीबद्दलचा पुरावा, LPG जोडणी क्रमांक, बँक पासबुक, विजेचे देयक, टेलिफोन/मोबाईल देयक, ड्रायव्हिंग लायसन्स, ओळखपत्र ( कार्यालयीन/ इतर), मतदार ओळखपत्र, आधार कार्ड इत्यादीच्या प्रती घेता येतील. दिलेला पुरावा हा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीपेक्षा जूना नसावा.

(५) र्फाममध्ये परिपूर्ण माहिती भरून घेऊन व आवश्यक जुनी कागदपत्रे जोडून घेवून, सर्व फॉर्म यादीसह संबधित शासकीय कर्मचारी/तलाठी यांनी क्षेत्रीय कार्यालयाकडे जमा करावेत.

Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap

www.msdhulap.com



वरील कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करावी. ही कार्यवाही करण्यासाठी उचित प्रसिद्धी माध्यमाद्वारे जनतेस सहभागी होण्याचे जाहीर आवाहन करावे.

**(ब) आलेल्या माहितीची तपासणी करणे :-**

१) वरीलप्रमाणे कार्यालयात जमा झालेल्या नमुन्यांची त्यासोबतच्या कागदपत्रांच्या तपासणी पुरवठा क्षेत्रीय कार्यालयांनी करावी.

२) वरील छाननी केल्यानंतर पुरेसा पुरावा असलेल्यांची यादी "गट अ" म्हणून करावी. तर "गट ब" मध्ये पुरावा न देणाऱ्यांची यादी करावी.

३) "गट- अ" यादीतील शिधापत्रिका धारंकाची शिधापत्रिका पुर्ववत चालू/कार्यरत राहील.

४) "गट- ब" यादीतील शिधापत्रिका त्वरीत निलंबित करण्यात याव्यात. अशा शिधापत्रिकेवर शिधावस्तू देण्याचे त्वरित थांबविण्यात यावे. व त्यानुसार दुकानदारास देण्यात येणाऱ्या नियतनात कपात करण्यात यावी.

५) वरील १ ते ४ प्रमाणे कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

६) "गट ब" यादीतील निलंबित केलेल्या शिधापत्रिका धारकांना आणखी १५ दिवसाची मुदत देऊन त्या कालावधीत ते त्या भागात राहत असल्याबाबत सबळ पुरावा देण्यास सांगावे. आवश्यकतेनुसार पुरावा देण्यास मुदतवाढ देण्याचा विचार करावा. त्यानंतरही पुरावा न आल्यास, पुरावा देऊ न शकलेल्यांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात याव्यात. ही कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करावी.

**(क)** वरील (अ) व (ब) प्रमाणे कार्यवाही करताना घ्यावयाची दक्षता :-

१) शिधापत्रिकेची तपासणी करताना, एका कुटुंबात व एका पत्यावर दोन शिधापत्रिका दिल्या जाणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत दोन वेगवेगळया शिधापत्रिका देणे आवश्यक असल्यास तसा निर्णय आवश्यक ती खातरजमा करून संबधित तहसीलदार अथवा तहसील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी/शिधावाटप अधिकाऱ्यांनी घ्यावा.

२) एकाच पत्यावर दोन शिधापत्रिका विभक्त कुटुंबामध्ये देताना, दोन्हीही शिधापत्रिका बी.पी.एल. अथवा अंत्योदय अन्न योजनेच्या असणार नाहीत.

३) वरील "गट अ" व "गट ब" मधील यादी जनतेस व प्रसिद्धी माध्यमास देण्यास प्रत्यवाय राहणार नाही.

**Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap**

www.msdhulap.com



४) पुराव्याची छाननी करताना संशयास्पद वाटणाऱ्या शिधापत्रिकांच्या पुराव्याबाबत पोलीसांकडून तपासणी करून घेण्यात यावी.

५) विदेशी नागरिकांना एकही शिधापत्रिका दिलेली असणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी.

२. वरीलप्रमाणे शिधापत्रिकांची तपासणी करताना, ज्या शासकीय/निमशासकीय कार्यालयातील/ खाजगी कंपन्यातील कर्मचारी/कामगार यांचे ज्ञात वार्षिक उत्पन्न रूपये १ लाखापेक्षा जास्त असेल अशा कर्मचाऱ्यांच्या शिधापत्रिका तात्काळ अपात्र ठरवून त्या रद्द करण्यात याव्यात व त्यांच्या मागणीनुसार त्यांना अन्य अनुज्ञेय शिधापत्रिका देण्याची कार्यवाही करावी.

३. शोध मोहिमेत विशेषत: शहरी भागात विदेशी नागरीकांच्या शिधापत्रिका शोधून त्या रद्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी. विदेशी नागरीकांच्या शिधापत्रिकांचा शोध घेताना आवश्यकतेनुसार पोलीस यंत्रणेची मदत घेण्यात यावी. **त्याचप्रमाणे दुबार, अस्तीत्वात नसलेल्या व्यक्ती, स्थलांतरीत व्यक्ती, मयत व्यक्ती या लाभार्थ्यांना वगळण्यात यावे.**

४. शिधापत्रिकांच्या तपासणीचा आढावा घेऊन तपासणीची कार्यपध्दती व इतर बाबींसाठी जिल्हाधिकारी तसेच मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी नियंत्रक शिधावाटप संचालक,नागरी पुरवठा,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये पुढीलप्रमाणे सदस्य असावेत :-

(१) जिल्हाधिकारी/नियंत्रक शिधावाटप संचालक नागरी पुरवठा,मुंबई (२) आयुक्त महानगरपालिका (३) पोलीस आयुक्त (४) पोलीस अधिक्षक (५) मुख्य कार्यकारी अधिकारी (६) अप्पर जिल्हाधिकारी (७) मुख्याधिकारी, अ वर्ग नगरपालिका (८) जिल्हा पुरवठा अधिकारी/उप नियंत्रक शिधावाटप

५. शिधापत्रिका चुकीच्या पध्दतीने वितरित केली असेल व त्यास शासकीय अधिकारी कर्मचारी जबाबदार असल्यास, संबधिताविरूद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती शासनास सादर करावी.

६. जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी त्यांना प्राप्त झालेले अर्ज व त्यांनी त्यांच्या अधिनस्त कार्यालयांना वितरित केलेले अर्ज तसेच शिधापत्रिकाधारकांना वितरित केलेले अर्ज व शिधापत्रिकाधारकांकडून माहिती भरून प्राप्त झालेले अर्ज यांचा ताळमेळ ठेवावा.

**Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap**

www.msdhulap.com



७. वरीलप्रमाणे राज्यात अपात्र शिधापत्रिकांची विशेष शोध मोहिम राबविण्यात यावी. या मोहिमेअंतर्गत अपात्र आढळून येणाऱ्या शिधापत्रिका रद्द करण्यात याव्यात व त्याप्रमाणात रास्तभाव दुकानांकडील कोटा कमी करण्यात यावा. अपात्र शिधापत्रिका मोहिमेबाबतचा अहवाल दिनांक १५ मे, २०२१ पर्यंत शासनास सादर करण्यात यावा.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०१२९१७५३२११४०६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Mahesh Hanamant Kanade

Digitally signed by Mahesh Hanamant Kanade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=186feed352c84c3011bad227b61957313fa6946400e5e6e2732b859a161e1411, cn=Mahesh Hanamant Kanade
Date: 2021.01.29 17:57:13 +05'30'

**( महेश कानडे )**

**सहपत्र : शिधापत्रिका तपासणी नमुना.** **कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

१) प्रधान सचिव,गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
२) प्रधान सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
३) प्रधान सचिव,ग्राम विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
४) सर्व मंत्रालयीन विभाग/मा.मुख्य सचिवांचे कार्यालय
५) सर्व विभागीय आयुक्त
६) नियंत्रक,शिधावाटप संचालक नागरी पुरवठा,मुंबई
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व महानगरपालिका आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
१०) सर्व पोलीस आयुक्त
११) सर्व पोलीस अधिक्षक
१२) सर्व उपायुक्त (पुरवठा)
१३) सर्व अपर जिल्हाधिकारी
१४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

**Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap**

www.msdhulap.com



१५) मा.मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव
१६) मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
१७) मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
१८) सर्व मा. मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१९) सर्व उपसचिव/अवर सचिव/सर्व कार्यासने अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
२०) निवड नस्ती (नापु-२८)

**Search for ineligible ration cards from February 1 - click here**

**Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap**

www.msdhulap.com



| |
|---|
| शिधापत्रिका धारकाचे छायाचित्र |

## शिधापत्रिका तपासणी नमुना

**अनुक्रमांक :-**

| गाव: | तालुका : | जिल्हा: |
|---|---|---|
| (१) शिधापत्रिकाधारकांचे संपूर्ण नाव (आडनावाने सुरवात करावी):- | | |
| वय :- | नागरीकत्व :- | व्यवसाय/नोकरी :- |
| व्यवसायाचा पत्ता - | | |
| शिधापत्रिकेची वर्गवारी | बीपीएल/अंत्योदय/अन्नपूर्णा/ केशरी/आस्थापना | |
| शिधापत्रिकेचा अनुक्रमांक: | | |
| २) पूर्ण निवासी पत्ता :- (आवश्यक पुरावा जोडावा) | | |

३) अर्जदार व कुटुंबातील घटक व्यक्तींची नावे व इतर माहिती :-

| अ.क्र. | अर्जदार व अर्जदारा व्यतिरिक्त कुटुंबातील घटक म्हणून अर्जदाराकडे सामान्यत: राहणाऱ्या व्यक्तींची नावे (घरातील नोकर वगळून ) | अर्जदाराशी नाते | स्त्री/पुरूष | वय | युनिट | व्यवसाय व वार्षिक उत्पन्न | नागरीकत्व |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| | एकूण | | | | | | |



Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap

www.msdhulap.com



४. कुटुंबातील सर्व व्यक्तींचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न रूपये -------

५. (अ) घरगुती स्वयंपाकाच्या गॅस जोडणीबाबत माहिती

१) गॅस जोडणीधारकाचे नाव :-
२) गॅस ग्राहक क्रमांक :-
३) गॅस सिलेंडरची संख्या :- एक/दोन
४) गॅस कंपनीचे नाव :-
५) गॅस वितरकाचे नाव व पत्ता :-

५. (ब) गॅस नसल्यास गॅस जोडणी नसल्याबाबतचे हमीपत्र अर्जासोबत सादर केले आहे .

६. चालू मतदार यादीमध्ये शिधापत्रिकाधारकाचे नाव आहे/नाही

७. निवासासंबधीचा पुरावा म्हणून खालीलपैकी कोणत्याही किमान एका कागदपत्रांची पुर्तता करावी. सदर पुरावा एका वर्षापेक्षा जास्त जुना नसावा. ( पुर्तता केलेल्या कागदपत्रासमोर ✓ अशी खूण करावी)

| | |
|---|---|
| (१) भाडेपावती | (२) निवासस्थानाच्या मालकीबद्दलचा पुरावा |
| (३) LPG जोडणी क्रमांक, | (४) विजेचे देयक |
| (५) टेलिफोन/मोबाईल देयक | (६) बँक पासबुक |
| (७) ड्रायव्हिंग लायसन्स | (८) मतदार ओळखपत्र, |
| (९)आधार कार्ड | (१०) ओळखपत्र ( कार्यालयीन/ इतर) |

दिनांक ----------                                  अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठयाचा ठसा

प्राधिकृत रास्तभाव दुकानाचे नाव व क्रमांक :

परवाना क्रमांक :

पत्ता :

रास्त भाव दुकानदाराची स्वाक्षरी :

---

## कार्यालयीन वापरासाठी

शिधापत्रिकाधारकाने रहीवासासोबत खालील पुरावे सादर केलेले आहेत/केलेले नाहीत.

| | | |
|---|---|---|
| (१) भाडेपावती | (२) निवासस्थानाच्या मालकीबद्दलचा पुरावा | (३) LPG जोडणी क्रमांक, |
| (४) विजेचे देयक | (५) टेलिफोन/मोबाईल देयक | (६) बँक पासबुक |
| (७) ड्रायव्हिंग लायसन्स | (८) मतदार ओळखपत्र | (९)आधार कार्ड |
| (१०) ओळखपत्र ( कार्यालयीन/ इतर) | | |

शिधापत्रिकाधारकाचे नाव यादी अ/ब मध्ये समाविष्ट करण्यास हरकत नाही (लागू नसेल ते खोडावे.)

तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम



Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap

www.msdhulap.com



## हमीपत्र

मी शपथपूर्वक लिहून देतो की, माझ्या नावावर तसेच शिधापत्रिकेतील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर गॅस जोडणी नाही.माझ्या नावावर तसेच शिधापत्रिकेतील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर गॅस जोडणी असल्याचे आढळून आल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात येईल याची जाणीव मला करून देण्यात आली आहे.

भविष्यात माझ्या नावावर किंवा शिधापत्रिकेतील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर गॅस जोडणी घेतल्यास त्याची माहिती तात्काळ शिधावाटप कार्यालयास देण्यास मी बंधनकारक राहील.

कुटुंबप्रमुखाची सही-

कुटुंबप्रमुखाचे नाव-

---

**पोच पावती**

शिधापत्रिकाधारकाचे नाव -

शिधापत्रिका क्रमांक -

पत्ता-

यांचेकडून अर्जासोबत खालील पुरावे जोडलेला अर्ज प्राप्त झाला आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) भाडेपावती | (२) निवासस्थानाच्या मालकीबद्दलचा पुरावा | (३) LPG जोडणी क्रमांक, |
| (४) विजेचे देयक | (५) टेलिफोन/मोबाईल देयक | (६) बँक पासबुक |
| (७) ड्रायव्हिंग लायसन्स | (८) मतदार ओळखपत्र | (९)आधार कार्ड |
| (१०) ओळखपत्र ( कार्यालयीन/ इतर) | | |

दिनांक :-

अर्ज स्विकृत करणाऱ्या कर्मचारी/तलाठी यांची स्वाक्षरी

**Join Our Telegram Channel :- https://t.me/MS_Dhulap**